जा.क्र. मसंके/प्रअ–टेट/ना.बा/ ५५८/ 3313 २०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी
दिनांक :– १६/११/२०२२ 16 NOV 2022

प्रती,
**मा. प्रभारी अधिकारी**
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बासाकोकृवि, दापोली

विषय :– ''नारळ शेंडे साफ करण्यासाठी कंत्राटी कामगार पुरविणे'' जाहीरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दीस देणेबाबत......

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, टेटवली विभागास ठेका पध्दतीने नारळ बागेतील नारळ साफ करावयाचे आहेत. तरी याबाबतची जाहीरात कृपया विद्यापीठाच्या www.dbskkv.org.in या संकेत स्थळावर प्रसिध्दीस देण्यात यावी ही विनंती.

**सोबत :– प्रसिध्दी नमुना**

आपला विश्वासू

**प्रभारी अधिकारी**
टेटवली विभाग
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता. दापोली, जि. रत्नागिरी

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
टेटवली विभाग

जा.क्र.मसंके/प्रअ–टेट/ना.बा/ ५५८ /३३१३ /२०२२ दिनांक :– १६/११/2022

## नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत टेटवली विभागामध्ये नारळ माडांचे शेंडे साफ करणे इत्यादी कामे दि. ०१/१२/२०२२ ते ३१/०१/२०२३ या आर्थिक वर्षाच्या कालावधीत करावयाची आहेत. त्याकरीता नारळ झाडांवरती कौशल्यपुर्ण चढणाऱ्या कंत्राटी कामगारांची आवश्यकता आहे. त्यासाठी कामगार पुरवठा करणाऱ्या इच्छुक ठेकेदारांकडुन/संस्थेकडुन कंत्राटी कामगार पुरविण्याकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छुक ठेकेदारांनी खालीलप्रमाणे अटी व शर्तीस अधिन राहुन दरपत्रके बंद लखोटयामध्ये निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयात दि. २५/११/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत पोहचतील अशा रितीने सादर करावे. विहीत मुदतीनंतर येणारी दरपत्रके ग्राहय धरली जाणार नाहीत. दरपत्रकाच्या लखोटयावर ''नारळ शेंडे साफ करण्यासाठी कंत्राटी कामगार पुरविणे'' या ठेक्यासाठी दरपत्रक मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली , टेटवली विभाग असे स्पष्ट नमुद करावे सदर ठेक्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

## ठेक्याच्या अटी व शर्ती

१. ठेकेदाराने एकुण कामाचे स्वरूप जागेवर प्रत्यक्ष पाहुन त्याप्रमाणे संपुर्ण कामाचा एकुण खर्च दरपत्रकात नमुद करावा.
२. कामाचे स्वरूप व किती काम करावयाचे याबाबत निम्नस्वाक्षरीकार ठरवून देतील त्याप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. व काम त्यांचे देखरेखीखाली करावयाचे आहे.
३. कामाची अदायगी महिना पुर्ण झाल्यानंतर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी प्रभारी अधिकारी यांचे काम वेळेत पुर्ण केले याबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.
४. अर्धवट काम सोडल्यास किंवा काम अपूर्ण असल्यास कामाच्या बिलांची अदायगी होणार नाही व आपले काम पुढील कामाच्या वेळी ग्राहय धरले जाणार नाही.
५. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.
६. ठेक्यातील सदर कामे ही कार्यालयीन वेळेतच पुर्ण करावयाची आहेत.
७. प्रक्षेत्रावरील दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, टेटवली विभागाच्या सोई व गरजेनुसार करणे ठेकेदार व त्याच्या मजुरांस बंधनकारक राहील तसे न केल्यास ठेका त्वरीत बंद करण्यात येईल.
८. दरपत्रकात देण्यात येणारे सर्व दर करांसहित नमुद करावेत. ठेक्याच्या कार्यवाही संदर्भातील सर्व अधिकार मा. संचालक मध्यवर्ती संशोधन केंद, वाकवली यांना राहतील.
९. नारळ बागेमध्ये साफसफाई करतेवेळी अपघात झाल्यास सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | झाडांची संख्या |
|---|---|---|
| १. | १. झाडांच्या शेंडयातील सुकलेले भाग काढणे.<br>२. झाडांच्या शेंडयामध्ये औषध टाकणे.<br>३. सुकलेल्या झावळया काढणे.<br>४. फुलांच्या पोयी काढणे.<br>५. तयार नारळ काढणे. | ४७३ |

प्रभारी अधिकारी
टेटवली विभाग
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली

प्रत माहितीसाठी :–
१. नोटीस बोर्ड, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
२. नोटीस बोर्ड, ग्रामपंचायत टेटवली, वाकवली, पांगारी

नाव :– श्री/सौ. ..........................................................

पत्ता :– ..........................................................

..........................................................

दिनांक :– / /

प्रति,

..........................................................

..........................................................

..........................................................

विषय : –..........................................................

..........................................................

संदर्भ:– ..........................................................

महोदय,

वरील विषयानुसार मी आपल्या अधिपत्याखालील ..............................विभागातील नारळ शेंडे साफ करणे हि कामे ठेका पध्दतीने करणेबाबत नोटीस वाचली असून प्रत्यक्ष जागेवर जावून कामाची पहाणी केली असून सदर कामाकरीता खालीलप्रमाणे दर सादर करीत आहे.

| अ. क्र | कामाचा तपशिल | झाडांची संख्या | दर प्रति झाड (रू.) | रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | एकुण | | | |

तरी वरीलप्रमाणे काम मला मिळावे ही विनंती.

आपला/आपली विश्वासू,

( .......................................................... )

# संमती पत्रक

मी खाली सही करणार श्री/श्रीमती ..............................................................राहणार.................... लिहुन देतो /देते की प्रक्षेत्रावरील कामे ठेका पध्दतीने करण्यास मी तयार असुन या बाबतच्या खालील अटी व शर्ती मला मान्य आहेत.

१. दरपत्रकामध्ये खाडाखोड, बदल किंवा नमुद केलेल्या दराचे व रक्कमेचे आकडे गिरविणे आदी आढळुन आल्यास दरपत्रक रद्द केले जाईल. तसेच दरपत्रके विहीत दरपत्रक नमुन्यामध्येच असणे गरजेचे आहे.

२. टेटवली विभागगामध्ये कामासाठी आवश्यक निविष्ठा या कार्यालयामार्फत पुरविण्यात येतील. तसेच कार्यालयीन वेळ संपल्यानंतर सदर निविष्ठा दररोज संबंधितांकडे जमा करावयाच्या आहेत.

३. ठेका अपुर्ण सोडल्यास ठेक्याच्या उर्वरीत बिलाची अदायगी केली जाणार नाही. व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबंधित ठेकेदाराचे दरपत्रक/निविष्ठा पुढील ठेक्याच्यावेळी ग्राहय धरले जाणार नाही. विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदारोने काम करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत रद्द केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

४. ठेकेदाराकडे पॅनकार्ड व बॅंक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी एनईएफटी/आरटीजीएस/ धनाकर्षाव्दारे करण्यात येईल.

५. ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्यास संबधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

६. ठेका कामाच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामागाराकडून/मजूराकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदारच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किमंत वसुल करण्यात येईल व त्याबाबत ठेकेदारावर कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.

७. ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात यईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेला ठेका कोणत्याही वेळी रदद करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

८. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक एस.एल.पी. ५४५३/९० निर्णयानुसार ठेकेदारास किंवा त्याने नेमलेल्या मजूरास ठेका कालावधीमध्ये /ठेका कालावधीनंतर विद्यापीठ/ शासकीय सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.

९. ज्या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखीत स्वरूपात सादर करणे बंधनकारक राहील. कंपनीने/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

१०. प्रचलित पध्दतीप्रमाणे ठेकेदाराचे देयकातुन आयकर कपात करणेत येईल.

( )

ठेकेदाराची सही/अंगठा